लोकमत

# बेल्हेश्वरमध्ये सायबर सुरक्षिततेवर व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**बेल्हा :** येथील श्री बेल्हेश्वर विद्यालयात सायबर सुरक्षिततेवर माहितीपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

क्विक हिल फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने व आळे येथील बी.जे. महाविद्यालयातील विद्यार्थी करत आहेत सायबर जनजागृती. सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या प्रकल्पांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थिनी साक्षी नेहरकर, ऋतू नेहरकर, समृद्धी टाकळकर, वैष्णवी तांबे, शुभांगी माळी आणि सानिका चौधरी यांनी श्री बेल्हेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा व माहिती तंत्रज्ञान युगात इंटरनेट वापरताना घ्यावयाची काळजी याविषयी माहिती देऊन सायबर जगतात सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक बाबींची ओळख करून दिली.

या विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञानाच्या युगात मोबाइलचा वापर व इंटरनेटचा वापर करताना काय काळजी घेतली पाहिजे हे समजून सांगितले. या विद्यार्थिनींच्या कामाचे प्राचार्य राजेंद्र पडवळ, पर्यवेक्षक दत्तात्रय खोरे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांनी कौतुक केले.

Hello Pune Gramin
Page No. 5 Jul 27, 2025
Powered by: erelego.com